२८५

निवृत्ति वेतनाची प्रकरणे त्वरित निकालात काढण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
परिपत्रक क्रमांक पीईएन-१७७९-सीआर-१३२८-एसईआर-४,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ नोव्हेंबर १९७९.

CR1979110101

## परिपत्रक

सेवानिवृत्त होणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांचे निवृत्तिवेतन मंजूर करण्यास व त्याला ते प्रत्यक्ष मिळण्यास होणारा विलंब टाळण्यासाठी यापूर्वी शासनाने व महालेखापालाने वेळोवेळी सविस्तर सूचना दिलेल्या आहेत. अर्हकारी सेवेचा कालावधी मोजणे आणि निवृत्तिवेतनयोग्य वेतन व निवृत्तिवेतन निश्चित करणे याबाबतचे नियम सुद्धा वेळोवेळी सुलभ करण्यात आलेले आहेत. अशा प्रकारचे उपाय अंमलात आणलेले असून सुद्धा अनेक प्रकरणांत सेवानिवृत्तिनंतर मिळणारे लाभ मंजूर करण्यास व ते प्रत्यक्ष मिळण्यास बराच वेळ लागतो असे आढळून आले आहे. निवृत्त झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यास सेवानिवृत्तिनंतरचे लाभ वेळीच मिळाले नाहीत तर त्यांची अतिशय आर्थिक कुचंबणा होते. ही कुचंबणा टाळता येण्यासारखी आहे. म्हणून निवृत्तिवेतनाची प्रकरणे अंतिमरीत्या निकालात काढण्यासाठी ही प्रकरणे हाताळणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने या गोष्टीची गंभीर दखल घेतली पाहिजे. सेवानिवृत्तिनंतर मिळणाऱ्या लाभांची प्रकरणे तातडीने निकालात काढली जातील तसेच शासकीय कर्मचारी सेवानिवृत्त होईल त्या वेळेपर्यंत त्याला सेवानिवृत्तिनंतर अनुज्ञेय (अॅडमिसीबल) असलेले सर्व लाभ मंजूर होतील व ठराविक तारखेस ते त्याला प्रत्यक्षपणे मिळू लागतील, हे पहाणे अत्यंत निकडीचे आहे. हे विभाग/कार्यालय प्रमुखांनी सतत लक्षात ठेवावे अशी शासनाची अपेक्षा आहे. म्हणून शासन आता खालीलप्रमाणे आदेश देत आहे :--

१) विभाग/कार्यालय प्रमुखांनी सेवानिवृत्तीच्या प्रकरणांकडे जातीने लक्ष द्यावे आणि अशी प्रकरणे अंतिमरीत्या निकालात काढण्यासाठी तातडीची उपाययोजना करावी. म्हणजे सेवानिवृत्त होणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्यास ठराविक तारखेपासून निवृत्तिवेतन मिळू लागेल. जसे - जर एखादा कर्मचारी 30 सप्टेंबर रोजी निवृत्त झाला तर, त्याला त्याचे निवृत्तिवेतन त्याच वर्षी १ नोव्हेंबर रोजी मिळाले पाहिजे.

२) सेवानिवृत्तिनंतरचे लाभ मंजूर करण्यास व ते प्रत्यक्ष मिळण्यास कोणत्याही प्रकारचा विलंब झाल्यास, त्या प्रकरणी गंभीर दखल घेतली जाईल आणि तपासाअंती या विलंबास जे कोणी जबाबदार असल्याचे आढळून येईल त्यांच्या विरुद्ध योग्य ती शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

३) निवृत्तिवेतनाची प्रकरणे वेळेवर निकालात काढण्याची मुख्य जबाबदारी निवृत्तिवेतन मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्यांची आहे. निवृत्तिवेतन मंजूर करण्यास विलंब झाल्यास, त्याबद्दल त्यांना व्यक्तिशः जबाबदार धरले जाईल हे त्यांनी ध्यानात ठेवावे. म्हणून शासनाची अशी अपेक्षा आहे की, या अधिकाऱ्यांनी त्यांच्या हिताच्या दृष्टीने, निवृत्तिवेतनाची किती प्रकरणे पडून आहेत व भविष्य काळात किती उद्भवतील याचा आढावा घ्यावा. त्यामुळे अशी प्रकरणे निकालात काढताना नेमक्या कुठे अडचणी येतात हे शोधून काढता येईल. तसेच अशा प्रकरणातील कार्यवाही कुठवर आली आहे यावरही त्यांनी सतत लक्ष ठेवावे, म्हणजे शासकीय -

कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीच्या तारखेपर्यंत निवृत्तिवेतनाचे एकही प्रकरण पडून राहणार नाही.

२. ह्या आदेशाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

वृ. प्रभाकर,
सचिव.

प्रति

महालेखापाल, महाराष्ट्र १, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र २, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (महाराष्ट्र राज्य),
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्र्यांचे व राज्यमंत्र्यांचे स्वीय सहाय्यक,
*प्रबंधक, मूळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप-लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
मंत्रालयाचे सर्व विभाग,
विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
संपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती, कार्यासन एसईआर-४, वित्त विभाग.

K.W.P.E.

*पत्राद्वारे.

क्रमांक लेखा-३३५/सां.अनु. १५५४/अ-३/७९ दिनांक ३१-१२-७९
प्रति- सर्व उपसं. श्र. अ.
यांच्या माहितीसाठी व मार्गदर्शनासाठी प्रत पाठविण्यात आली आहे.

for S.E. ... P. Pune
७-१-८०

" य- परिपत्रकातील सूचनांची अंमलबजावणी तातडीने करणे

कार्यासन अधिकारी-अ-३

एच-९४८ (७००० + ५-१०-७९) १-अ.

प्रत- का-अ-ई-१

Expeditious disposal of
Pension cases

223

GOVERNMENT OF MAHARASHTRA
Finance Department,
Circular No. PEN-1779/CR-1328/SER-4,
Mantralaya, Bombay 400 032, dated 1st November 1979.

**CIRCULAR**

With a view to eliminating delay in sanctioning and payment of pension to a retiring Government employee detailed instructions have been issued from time to time by Government and Accountant General in the past. Rules reckoning the qualifying service and regulating pensionable pay and pension have also been simplified. Inspite of all these measures it is noticed that considerable delay in according sanction to and payment of retirement benefits persists in a number of cases. This is a matter of serious concern for every one who has a role to play in finalisation of pension cases by the due date particularly since non-payment of retirement benefits by the due date causes avoidable pecuniary hardship to a retired Government employee. Government desires to impress upon the Heads of Departments/Offices the urgency with which claims for retirement benefits need to be settled and the need for ensuring sanction to admissible retirement benefits by the time a Government employee retires and payment thereof on the due date. Government is therefore, pleased to direct that :-

(i) Heads of Departments/Offices should pay personal attention to pension claims and take energetic steps to see that they are finalised in time so that a retired Government employee starts getting his pension on the due date i.e. if a Government employee retired on the 30th September, he gets his pension on the 1st November of the same year.

(ii) any delay in sanction to and payment of retirement benefits will be viewed with serious concern and investigated with a view to taking appropriate disciplinary action against those found to be responsible for the same.

(iii) to impress upon the pension sanctioning authorities that it being their primary responsibility of finalising pension claims in time, they will be personally held responsible for delay in sanctioning pensions. Government therefore, expects that in their own interest they should take a detailed review of all pending pension claims and also those which would arise in future with a view to locating precisely the bottlenecks in their progress and keep a constant vigilant watch over the progress of such claims so that no pension claim remains pending by the date of retirement of a Government employee.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

V. PRABHAKAR,
Secretary to Government,
Finance Department.

H-948(7000+5-10-79)2.